
मनातल्या
मनात
विनीत वैद्य
साहित्य प्रतिष्ठान
vinit

galatalyagalat@gmail.com

# गालातल्या गालात

लेखक : विनीत वैद्य

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

पुस्तकाचे नांव: गालातल्या गालात

प्रकार : कथा

लेखक : विनीत सतीश वैद्य.

‘वसुधा’, गांधीनगर. बार्शी

जि. सोलापूर.

8237756096

galatalyagalat@gmail.com

www.facebook.com/vinit.vaidya2

मुखपृष्ठ. अंतर्गत सजावट :

विनीत सतीश वैद्य.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान®

esahity@gmail.com

www.esahity.com

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

• या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक. सिनेमा. सिरियल. स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2012

ई साहित्य प्रतिष्ठान ही कवी, लेखक व वाचकांनी मिळून चालवलेली चळवळ आहे. नवीन उदयोन्मुख लेखकांसाठी हे व्यासपीठ आहे, आणि खेडोपाडी व देशॊदेशी पसरलेल्या मराठी वाचकांसाठी वाचनाचे साधन आहे. ई पुस्तके. आता स्मार्टफ़ोनवर डाऊनलोड करून वाचता येतात. आपण या चळवळीला हातभार लावू शकता. आपल्या ओळखीच्या लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांनाही विनामूल्य ई पुस्तके पाठवू.

# अर्पणपत्रिका

मोठ्या माणसांच्या चरित्रावरून नजर फिरवली तर लक्षात येतं कि अश्या खूप खूप गोष्टी कराव्या लागतात. त्यामुळे मोठं होणं, कीर्ती मिळवणं, यशस्वी होणं, त्याच बरोबर स्वतःची चांगली ओळख तयार होणं प्रत्येकाचं स्वतःचं एक खास स्वप्न असतं. पण यश कुणाला सहजासहजी मिळत नसतं. यश मिळवावं लागत. 'मोठं' होणं अवघड जरी असलं तरी प्रयत्नांनी त्या नजीक पोहोचण्याचा अट्टाहास उरी जरूर बाळगावा; मनाशी स्वप्न असलं, ते प्रत्यक्षात आणण्यासाठी चिकाटी अन पाठीवर कौतुकाची थाप असली तर. क्या बात है !

हे माझं  पहिलंवहिलं ई-पुस्तक

ई साहित्य प्रतिष्ठान व सर्व फेसबुक मित्रमंडळास

प्रेमपुर्वक अर्पण.

# अनुक्रम

साखरझोप

गप्पाटप्पा

प्रेमाची चाहूल

डिटेक्टीव्ह

स्वप्नभंग

# साखरझोप

मोबाईल चा अलार्म अर्धा तास झाला वाजत होता. शेवटी आई आली आणि म्हणाली

‘ उठ बाळ .....! माझ्या राजा... माझ्या सोन्या... बघ तुझ्यासाठी काय गरम गरम थालिपीठ केलंय. आणि वर ताजं ताजं लोणी. माझ्या सोनुल्याला आवडतं म्हणून... चल माझ्या राजाला पॉकेटमनी काढून ठेवलाय बघ बाबांनी. आणि तुला नवीन जीन्स हवी होती ना? कसली ली-वायची का शि-वायची ती...

त्याचे पैसे पण काढून ठेवलेत बाबांनी. मग उठतोस ना? कि थोड्या वेळाने उठवू बाळ?... ... ... ...

श्या... असं तर मुळीच नाही. चक्क ओरडली. आजूबाजूच्या दहा घरांतून ऐकू येईल असं...

“विन्या.......... गधड्या! आधी तो अलार्म बंद कर; ऊठ. धाकट्याचे गुण घ्या जरा. लेकरू कधीच उठून अभ्यासाला बसलंय आणि तुम्ही लोळा अजून. थांब! तुझ हे खूप होतंय. बस्स झालं. आत्ता ‘ह्यांना’ चांगली हजेरी घ्यायला सांगते. सोनूला “अभ्यास पूरे कर” म्हणावे लागते आणि तूला “अभ्यास कर रे बाबा” म्हणून लाटणे घेऊन मागे धावावे लागते. झालं............

आईचा FM रेडीओ सुरु झाला कि चॅनल थांबतच नाही. थेट मलिष्का... बक बक.. बक बक...धो धो धो...

आपले अंथरूण सकाळी अश्या गमतीदारपणे सुटत असते कि त्याची मजा औरच असते. पण स्वतः सूर्य डोक्यावर येईपर्यंत लोळत पडणारा मुलगा जेव्हा बाप होतो तेव्हा मात्र तो स्वतःच्या लहानग्यांना रोज पहाटे उठवण्यास का सुरुवात करतो ते कळत नाही. अधून मधून लहानग्यांना बिलगून झोपायला काय हरकत आहे? नाही का!

आमच्याकडे धाकट्याचे कौतुक फार असते. सहसा लक्षात येतं कि दोघा भावंडांमध्ये एक हुश्शार असतो अन् एक टुक्कार चाबरा. देवाची करणी. एका हाताची पाच बोटं सारखी नसतात. सगळे भाऊ सारखे कसे असतील? पण शाळेत नेहमी प्रसंग उभे राहतात. चेहरेपट्टी वरून सर लोकांना लगेच कळते कि हे भाऊ-भाऊ, बहिण-भाऊ आहेत. अन् नेमके यांना हेरून असे टोमणे मारायची संधी साधणार!

"तुझा तोच कारे भाऊ ? ... कुठे तो अन् कुठे तू? तो वर्गात अभ्यासात एक नंबर होता अन् हे महाशय खोड्या करण्यात प्रथम" वगैरे वगैरे...

कुठे आम्ही?

आमच्या बुद्धीमत्तेचे एकेक किस्से सांगू तर बेशुद्ध पडाल.

पण एक किश्शी (छोट्या किश्श्याला किश्शी म्हणतात) आवर्जून सांगाविशी वाटते. आम्ही साधारण पहिली दुसरी तिसरीत असू. तेव्हा बोलायचे झाले तर STD. PCO किंवा क्वाईनबॉक्सचा जमाना. मोबाईलची एंट्री नुकतीच झालेली. ज्याच्याकडे असेल त्याला भाव. इनेगिने चार लोकांकडे असायचा. तो गळयात टांगून तो मिरवायचा. मिजाज हो! अजून काय? शेजारच्याला कसे जळवायचे याचाच सतत विचार ध्यानीमनी! मुलांच्या हातात तर सोडा, दृष्टीस पण पडू देत नव्हते. आणि मुलांना पैसे टाकून PCO पण वापरायला बंदी. पैसेच नव्हतेच तर काय?

अश्यातच आमचा लंगोटी यार पिंटू... हा तसा दिसायला सर्वात वेगळा असा होता. तोंडाला चोपलेली पावडर अन् केसातून कपाळावर झिरपणारे

पचपच तेल. त्यात तो टाय कसला? गळफासच. आणि क्वालर... चावून चावून त्याची एक बाजू लांब केलेली. मधून मधून नाकाबाहेर डोकावणारा. . . . शेंबुड! तो पुसायला खिश्याला पिन केलेला रुमाल. आणि एका खांद्यावरून लटकणारे दप्तर. चालताना ते ठुमके मारत उडवायचे... एका बोटानी डब्याची पिशवी फिरवीत फिरवीत यायचा. याच्या डब्यात पण कायम नवीन नवीन पदार्थ. आमच्याकडे बट्टाट्याची भाजी आणि पुरी. पिंटूकडे कधी सँडविच, कधी समोसे, कधी मॅगी, कधी उपमा, कधी कुरकुरीत बिस्किटं.

तर पिंटू एकदा आला आणि रुबाबात म्हणाला  कि १०० नंबर फिरवला तर पैसे पडत नाहीत ! याच्या अशाच रोज काही ना काही नवनवीन खिरापती .....

झालं.  मग बालगोपालात चर्चासत्र रंगले. कि १०० हा नंबर फिरवला तर फोन 'फुकट' लागतो. क्वाईन टाकायची गरज नाही. मग काय लगेच शाळेबाहेरच्या STD मध्ये पिटुकले गेलो.

वरून खालपर्यंत पिवळया रंगाचे ते STD बुथ. अन् एक  क्वाईनबॉक्स साधारण चार-पाच फुटावर भिंतीला टांगलेला होता. उभारायला जागा तशी एकासाठीच असते. पण पिटुकल्याना भारी आकर्षण. एकदम सगळे त्यात दाटीवाटीने घुसले. पण फोन कोणाच्याच हाताला येईना. कारण तो अमिताभच्या हाईटवर. आणि आम्ही राजपाल यादव. मग एकाला कोंबडा बनवले. त्याच्या पाठीवर चढून दुसऱ्याने हातात घेतला. 'नाका पेक्षा मोती जड' असा तो फोन! एकाने उचलला दोन हातांनी. तिसऱ्याने १०० नंबर फटाफट डायल केला. अन् खरोखर! पैसे न टाकता रिंग वाजू लागली. तसाच कानाला लावून तो उभा. तिकडून कोणीतरी बोलताय याच कसलेही भान नव्हते. मग

त्याने दुसऱ्याकडे दिला. त्याने तिसऱ्याकडे. तोवर कोंबडा बनलेलं पोरगं उभारलं. त्याच्या पाठीवरचं पिल्लू खाली पडलं. मग एकच गलका. फ़ोन चालूच. सर्वांनी फ़ोनचा आवाज ऐकला. आणि मनाला येईल ते बोललो. सगळी गडबड गडबड. आमच्या आयुष्यातला हा पहिला फ़ोन. आत्ता भाबडी पोरटी आम्ही! काय बडबडलो तेच माहित नाही आम्हाला.

त्यानंतर घडामोडी इतक्या फास्ट घडल्या कि आम्हाला काहीच कळाले नाही. तो फोन कसाबसा परत लटकवून बाहेर पडलो. आमच्यात च्यावच्याव सुरू होती. बाहेर पडतो तोच तितक्यात सामोर खाकी वर्दीतला हवालदार. समोर STD वाल्याने सांगितले "हीच ती चिल्लीपिल्ली! यांनीच नंबर फिरवला". मग हवालदार आम्हाला पिटुकल्यांना मुख्याध्यापकांकडे घेवून गेले. अवघ्या काही मिनिटात हेडमास्तरांच्या ऑफिस बाहेर ही तुडुंब गर्दी उसळली. पोरांची पूर्ण शाळेत कुजबुज. आणि त्यात भर पालक लोकांची. तासभर हवालदार सरांना झापत होते. त्यात अर्थात आम्ही सर्व सुदृढ बालक. जरा जोरात रागे भरले तर सगळ्यांच्या चड्ड्या ओल्या.

तेव्हापासून आजवर कोणीच १०० नंबर लावला नसेल! घरात चोर आला तरी

-----

अभ्यासात दहावी आणि बारावीचे अभ्यासाचे टेन्शन पोरापेक्षा हे त्यांच्या घरच्यांनाच भारी असते. मग या काळात लेकरांना त्रास होऊ नये म्हणून

घराचे मेंबर लोग काही कमी पडू देत नाहीत. अगदी बसल्या जागी सगळे हवं ते मिळे.

आई “आमचा धाकटा दहावीला आहे” म्हणायची. जणू काही आपणच परीक्षा देणार आहोत असा गोड समज आई करून घ्यायची. आणि किती टेन्शनमध्ये आहे हे सगळीकडे टाळ कुटत सांगायची. आणि मी. माझ्या हातात पुस्तक असतेच कुठे? त्यामुळे उठता बसता बोलणे खायचो. पण मी पुस्तकी किडा मात्र नव्हतो. कधी पाठांतर घोकंपट्टी केलीय असे अजिबात नाही. वेगळेच व्यक्तिमत्व. प्रत्येक घरात अशी भूमिका कोणी न कोणी साकारतच असतो. आणि महत्वाचे म्हणजे काहींची हुल्लडबाजी उंबरा ओलांडल्यावर; तर काहींची घरात आल्यावर सुरु असते. धाकटे कधी डोक्यावर बसतात. तर थोरल्याना जरा हरबरयाच्या झाडावर चढवले की मामला खुश. काय तर निखळ आनंद. ज्या घरात तायालोग आहेत तिथे तर एक्स्ट्रा टॉपिंग. बहिणी ज्यांना आहेत त्यांची तर मज्जा औरच असते. पाणि प्यायला पण उठायची गरज नसते. खायला काय मागू ते देणार. रात्री उशीरा झोपेतून उठून कॉफ़ी देणार. सूप, ज्युस. उकडलेली कणसं. सोललेल्या शेंगा. काय काय हवं ते. श्या. मला सख्खी बहिणच नव्हती ना. सगळी मज्जा गेली.

इकडे माझे घोरणे चालूच होते. ४ चा अलार्म सहा वाजले तरी अजून वाजतच होता. एक दोन वेळेस आई उठवणार. तिचा प्रेमळ आवाज मघा सांगितलाच तुम्हाला. पण ती दोन तासांनी थकते. आणि मलिष्काच्या जागी जितूराज येतो. म्हणजे आमचे पिताश्री. मात्र वडीलांनी डरकाळी फोडली रे फोडली लगेच कडकडून जाग; विशेष म्हणजे जाणवत होते कि गजर होतोय. पण मी आपला झोपेत गाढ ! गजर बंद करायला पण हात उठत नसत. ती

असतेच अशी कि डोळे झाकलेले असले तरी आजू बाजू काय हालचाल सुरु आहे यावर लक्ष असते. तेही स्वप्न पाहत पाहत. पण हालचाल शून्य. गम्मतच आहे.... एकदम आठवले आज गणपती विसर्जन आहे आपल्याला सोसायटीतल्या गणपतीची तयारी करायची आहे ब्वा.

सकाळचे विधी आटोपले. झट कि पट खसखस दात घासले. बुडबुड दोन तांबे. साबणाचा तो फेस अन् थेट बादली पालथी. नाश्त्याला पोहे. तशी माझी मातोश्री पोहे छान करते. पोटभर खाल्ले. चहा बिहा घेतला. आणि निघालो.

इकडे सावळा गोंधळ विसर्जन मिरवणुकीला ढोल-हलगीवाल्यांची सुपारी मिळाली नाही. मग पर्याय उपलब्ध होताच. डॉल्बी डीजे. पोलिसांची परवानगी न घेता. कारण सोसायटीत श्री.डोळस पो.निरीक्षक राहत असत. डोळस म्हणजे सिंघम. जसे सिनेमे रिलीज होत तसे यांना टोपण नावे पडत. सध्या तरी सिंघम नावाने ओळखतो. काय म्हणता? चुलबुल पांडे? श्या ! छे हो! ते शोभत नाही. चुलबुल पांडे काय? पोलीस म्हणजे एकच चित्र उभे राहते! ढेरी सुटलेले. अन् त्यांच्या तोंडून होणारा तो मराठी-हिंदी चा काला. पण याला अपवाद सिंघम होते.

त्यांना सर्व मामला सांगितला. मग त्यांनी सर्वांच्या चेहऱ्याकडे पहिले अन् हसत म्हणाले

“काळजी नको ह्म्म्म हं...हं....हं! मै हुं ना”

मग कुठे सर्वांचे चेहरे खुलले.

थेट मिरवणुकीस सुरुवात केली.

गणपती बाप्पा !.... मोरया!!

मिरवणूक चालू होती. कार्यकर्ते भलतेच जोशात नाचत होते. त्यांना वडा पाव, वेफ़र वगैरे मिळत होते. मात्र मी आपला काळजीत. ट्रालीत बाप्पांना धरून उभा होतो.

रस्ते कुठे धड? सह्याद्रीच्या डोंगरातून चाललोत असे खड्डे. बाप्पा एकदा डावीकडे एकदा उजवीकडे असे डुलत डुलत चालले.

दरवर्षी बाप्पां एडजस्ट करत आलेत. यंदाही करतील. त्यात काय? त्यांच्या यायच्या जायच्या वेळेसच रस्त्यांना खड्डे पडतात. मग म्युनिसिपाल्टीवाले थुंकी लावून ते रिपेर करतात. खड्डे भरो न भरो, यांचे खिसे, कपाटे, लॉकर भरतात. आणि आपण आपले “मोरया” “मोरया” बोंबलत बाप्पांना धरून उभे. बाप्पांना गावी पाठवायचे होते ना. मी बाप्पांना धरून उभा आहे कि मला उभारायला बाप्पा आधार देत होते तेच पाहणाऱ्यांच्या लक्षात येईना. कारण बाप्पा डावीकडे डोलले की मी उजवीकडे कलत होतो आणि बाप्पा उजवी कडे डोलले की मी उजवीकडे झोपत होतो. माझा पाय तर स्केटिंगसारखा सरकत होता. डिस्को डान्स. आणि चेहऱ्यावर अशी भिती की लोक मलाच बुडवायला निघाले की काय!

असो! गमतीचा भाग जाऊ दे. माझा डीजेला विरोध होताच. पण हा जल्लोष पाहता सगळे विसरून बेभान नाचायचे मनात होते. तोच मला तिघानी धरून ओढत खालती खेचला. आणि खांद्यावर उचलून नाचू लागले... चिकनी चमेली बिल्कुल अकेली पव्वा चढाके आयी... मी एकदम भारी डान्सस्टेप करत

होतो. माझा डान्स बघायला प्रभुदेवा आला असता तर चार दोन स्टेप शिकून गेला असता. बाकी सर्व जण एक्स्ट्रासारखे माझ्या भोवती. आणि मी हिरो. पोरी तर गालावर हात ठेवून भान हरपून बघत होत्या. ... ...

अजिबात नाही. असे होणार नव्हते. इतकी मिजाज माझी नव्हती. हां! पण मागे असणाऱ्या ढोल पथकात मात्र मानाने फेटा चढवून एक दोन ठेके धरले खरे. उगी अंगात भूत आल्यागत नाचण्यापेक्षा. तब्येतीत चांगलं नाचावं. बघणाऱ्यांना वाटलं पाहिजे. आपापल्या सखी साजणीवर इम्प्रेशन पाडण्यासाठी याहून अधिक संधी कुठे? साहजिक आपला हिरो कसा ढोल बडवतोय हे पाहायला त्याहि बाल्कनीत अगदी टाचा वर करू करू पाहत असतात; हो कि नाही तायानो? मग हिरोचे काय पहायचे? अजून अंगात जोर वाढत असे

आणि बालपणाचे म्हणाल तर ते भोळे भाबडे दिवस गेले. अन ते चक्क आपण अनुभवले असले तरी अन् काहीना उशिरा अक्कल येते. कि बालपणात आपण जी गंमत करायला हवी होती ती केलीच नाहीये. मग 'लहानपण देगा देवा' कुठल्या तोंडाने म्हणणार देवाला? कारण याना बालपण देऊन हे करणार काय? कप्पाळ? मिळाले तेव्हा काय तीर मारला यांनी?

बाप्पा फक्त गालातल्या गालात हसेल! बाप्पांना पण बालपणात जावं वाटत नाही का?

पुढे होयचे तेच झाले. पोलिसांनी चौकात हटकलेच. तुमच्या मंडळाचे नाव यादीत नाहीये. कोण अध्यक्ष आहे सांगा....!

मग आमच्यातले चार चौघे बोलबचन त्या पोलिसांना सत्यनारायण कथा सांगत बसले. पोलिसांना स्टोरीचा आगा पिछा काही समजण्याची शक्यताच नव्हती. पोलिसांना चक्कर  येईतो गोल गोल घुमवला. तोवर मी सिंघमला इमर्जन्सी फोन लावला... एक दोन रिंगा वाजल्यावर त्यांनी तो उचलला. त्या दोन रिंगा म्हणजे दोन दिवसच. पण त्यांनी उचलल्यावर मी हुश्श केले आणि प्रकार कानावर घातला. ते म्हणले मी सांगतो. त्यांना फोन दे. मग त्यांची बातचीत झाली. “आपलीच पोरं आहेत”. सांगितले “ढील द्या” “ओके !”

आमचा सिंघम अखेर उपयोगी पडला. एक बाब खटकली पतंगाला ढील हि उंच झेप अन् सर्वोच्च शिखर गाठायला दिलेली असते. पण आमच्या मुळातच भरकटलेल्या पोरांना दिलेल्या ढीलेमुळे साहजिकच त्यांचा पतंग भरकटणार. आणि काटला जाणार होता. चुकांची जाणीव जागच्या जागीच करून दिलेली बरी. पुढील वेळी पुन्हा असं काही करावयास धजावणार नाही कश्या वरून?

पण त्या पोलिसाने जाता जाता डीजे रोहितचा गाल लाल करतच दोन चार भारीपैकी मस्त कोल्हापुरी शिव्या हासडल्या. डॉल्बीचा आवाज कमी ठेव बोलले. आणि कल्टी मारली

हुश्श .................

चायला! मी वाचलो. नाहीतर आज काही खरे नव्हते बॉ.  मी मनोमन बाप्पाला धन्यवाद दिले. एवढ्या जोरात माझा कान वाजला असता तर माझा डॉल्बी स्पिकर फ़ुटलाच असता.

तळ्यावर पोहोचणारच होते काही तासात. तोच किती वाजले पाहायला मोबाईल काढून पाहतो तर ७ मिसकॉल होते. अननोन नंबर. तेवढ्यात परत फोन आला. उचलला. धड काहीच ऐकू येईना.

मी मात्र फोनवर किंचाळत होतो, “हेल्लो हाय..... हेल्लो.. मोठ्याने बोला. ऐकू येत नाहियेे..... आपण कोण बोलत आहात....”

झालं गोंगाटाने फोन कट. लगेच परत फोन आला. मी धावत एका बंद गाडीत जाऊन बसलो आणि मग ऐकू येऊ लागले. पण एवढेच  कळले कि

“हाय मी वृंदा बोलतेय” (वृंदा कोण तर माझी कोल्हापूरची बहिण).

“हाय चिंगी आज कशी आठवण काढली माझी..........?  सूर्य पश्चिमेला तर उगवला नाही ना?”

‘झालं का सुरु तुझं?’

“हे बघ मी जरा बिझी आहे नंतर बोलू. बाप्पा माझी वाट बघतोय. ओके. बाय!”

तळ्यावर ज्याचे त्याचे आरती ओवाळणे आणि दिसेल त्याला मोदकं वाटायचे काम चालु होते. सोसायटीच्या सेक्रेटरीने इशारा केला. एकीकडे जरा जागा मोकळी दिसली. पोरांनी बाप्पांना तिथे आणले. आरती आटोपटाच.. पाण्यात श्रींची मूर्ती विसर्जित करायला होडीत चढवली. अन् पोहता येत नव्हते तरी मी पठ्ठ्या कपडे काढून थेट पाण्यात शिरलो. जोवर पायाला तळ लागत होतो तोवर ठीक होते. खांद्याला पाणी लागले अन तितक्यातच खाली खळगा आला. पायाला जमीन गवसेना. मला हात पाय हलवायचे सुचेना. बुडालोच

होतो. दोन गटांगळया खाल्ल्या. नाकात पाणी गेल्याने एक शहारी उठली. आणि झिणझिण्या आल्या. अन बोबडी वळाली. रामाचं नांव घेतलं. मनोमन फ़ेसबुकवर स्टेटस अपडेट केला. “गुडबाय ... शेवटचा”. आणि डोळे मिटले.

तोच डब्लूडब्लूएफ मधल्या खलीसारख्या एका तगड्या इसमाने मानगुटाला धरले. अन मांजरीचे पिल्लाला धरून उचलून आणावे तसे मला पाण्यातून बाहेर काढलं.

‘मरायचं आहे काय रे भाड्या. परत पाण्यात पाय ठेव. तंगड्या तोडून हातात देईन ’

छातीचे ठोके डॉल्बी डि जे सारखे ऐकू येत होते इतका मी घाबरलेला. तशी पण प्यांट उतरलेलीच होती. खलीने होती नव्हती ती अंडरप्यांटपण उतरवली.

मग प्यांट वर चढवून टी शर्ट चे वरचे बटन लावत जणू काही झालेच नाही अशा ऐटीत बाहेर आलो. “पोहायला मात्र शिकायला हवे” अशी खूणगाठ मनाशी बांधली. आणि आडवी मान हालवत गालातल्या गालात हसलो !

# गप्पाटप्पा

बाप्पांना निरोप दिला. सगळे जिकडे-तिकडे झाले. आटोपल्यावर दोन आठवड्यांनी परत sms आला. वृंदाचा.

हल्ली एक तसे जुनेच पण म्हटले तर नवीन फ्याड आहे. थेट बोलण्यापेक्षा sms वरच गप्पा जरा जास्त चालतात. खिश्यास हि परवडते आणि मोजकेच बोलून झट कि पट काम होते.. पण याच कारणास्तव मोबाईल सदा’न’कदा हातात. मोबाईलची बटणं खटखट दाबत बसायचे. त्यात टच स्क्रीनच असेल तर बोलणंच नको. प्रेयसीच्या गालावर हात फिरवतोय जणू इतके ते प्रेम. अहाहा! क्या बात ! क्या बात !! क्या बात!!!

इकड तिकडच्या गप्पा झाल्यावर म्हणजे घराची वगैरे बातचीत आटोपून तिने मूळ मुद्यास हात घातला.

“मग अजून काय समथिंग स्पेशल”

“नथींग स्पेशल. तू बोल ........”

“काही नाही रे. एक विचारायचे होते”

“एक काय. शंभर प्रश्न जरी विचारलेस ना तरी चालेल ;)”

“प्रॉमिस कर रागावणार नाहीस :)”

“आत्ता विचारतेस का नाही”

“म्हणजे तुला विचारायचे होते कि ...”

“पंचांगात मुहूर्त पाहत आहेस का विचार ना पटकन”

“तुला मैत्रीण आहे का .. ;) ?”

लागलीच एक ब्ल्यांक मेसेज गेला

मी चपापलो.  मैत्रिण आहे का या प्रश्नाला उत्तर हो किंवा नाही यातलं सरळ सोपं देणं सोपं नाही ब्वा. समजऊन सांगू?

इन्फोर्मेशन टेक्नो. विषय आधीच डोक्याचा भूगा.  सहसा प्रवेश तर हाउसफुल्ल झालेला होता. ६० पैकी तिसऱ्या वर्षी  उरले सुरले आम्ही ७ मुले आणि २८ मुली होत्या क्लास मध्ये. आजकालची गंमत अशी कि मुलांच्या दांड्या फार. जोडून सुट्टी दिसली कि मुले आठवडाभर गायब. तेवढेच निमित्त हवे असते.

साहजिक 'हळदी कुंकू' करत भटकायचे, फिरायचे असते ना ;) आणि सर्व मुली मात्र एक दिवस पण बुट्टी बंक मारणार नाहीत.. मस्त पैकी डब्बे वगेरे घेऊन येणार. तश्या यायला उशीर करायच्या. पण कंटाळायच्या नाहीत. लेक्चर सुटल्यावर देखील सर् लोकांची पाठ सोडत नसत. एक कळत नाही राव या घराची कामं टाळण्यासाठी तर पूर्ण दिवस कॉलेज करत नसतील ना ?

ना ना ! असं मनातही आणू नका. घरचे सगळे काम करत अभ्यास करणे सोप्पे काम नव्हे ! उलट मुले घराचे कामही करत नाहीत. अभ्यासाची आयती सबब असते कामाला बुट्टी मारायला.

आम्ही शहरी जरी राहत असलो तरी मुले मुलीना बोलायला लाजायचे. घाबरायचे. काय प्रॉब्लेम असतो काय माहित. पण शाळेत सहसा मुलींशी मैत्री क्वचितच पहावयास मिळते. तेही कोण बहिण भावंडे एकाच वर्गात असतील तर मुली बोलतात. हो बिनधास्त. पण एरवी ऐट मारणाऱ्या मुलांची मुलींशी बोलायच्यावेळी मात्र ततपप उडते. आणि काही काम निघालेच तर मुलींना बोलणार कोण? सगळे एकमेकाच्या तोंडाकडे पाहणार. अन अशा वेळी मला पुढे सारणार.

"तूच सांभाळ रे"

मुलींचे उलट भारीच काम होते. त्या रात्रंदिवस एक करून प्रोजेक्ट पूर्ण करायच्या. आम्ही आयत्या पिठावर रेगोट्या मारायचो. त्यांचे प्रोग्राम कॉपी करायचो. कॉपी करताना त्यांच्या प्रोग्राममध्ये होणाऱ्या चुका मात्र गुपचूप दुरुस्त करून ते चेकिंगला द्यायचो. लेक्चररना ते चेक करताना एखादी चूक दिसली रे दिसली कि अन त्यांच्या कानातून निघणारा धूर आम्हाला दिसायचा... पण

मुलांची बाब वेगळी. 'हो सर् . करतो दुरुस्त' बोलायचो. काय आहे हिम्मत होयची नाही उलटे बोलायला?

मुली मात्र उलट उत्तरे द्यायच्या. वाद घालायच्या. चुका कबूल करायच्याच नाहीत. अन कमाल म्हणजे सर् काहीच बोलत नसत. हे कसे काय जमते त्यांनाच माहित ! नंतर मात्र मुली जाताच सावळा गोंधळ. आम्ही नुसते गालातल्या गालात. सगळा स्टाफ एकमेकांना पाहत हसायचो.

त्यामुळे मला मैत्रीण नाही असे म्हणणे चुकीचे झाले असते. पण...

"आहेत ना........ ;) :-)) आहेत ना ग त्यात काय विचारणे झाले होय !"

"असतीलच शंकाच नाही; तरी कोणी खास त्यातल्या त्यात जवळची फ्रेंड"

"जवळच्या म्हणजे आमच्याच सोसायटीत दोन मुली राहतात"

"ह्म्म्म बुद्धू ... तशी मैत्रीण नाही रे....... gf गर्लफ्रेंड म्हणतेय मी :p !"

"ते काय असते? मैत्रीणच ना !"

"उगाच विषय फिरवू नकोस हा. सगळे कळतंय पण कळत नसल्यासारखा वागू नकोस :( !"

"अजिबात नाही . मला gf नाहीये ;):p"

"किती खोटं बोलशील रे. तुला एका मुली बरोबर फिरताना पाहिले आहे मी"

“म्हणून काय झालं. ती लगेच माझी gf थोडीच झाली?”

“कोण आवडते का रे तुला? नाही म्हणजे मी मदत केली असती तुला :)”

“काही नको :p !”

“माझा मी खंबीर आहे”

“अरे वाह चांगलंय .......”

“पुरे चल आत्ता बास”

मी आता sms विंडो बंद करायच्या बेतात.

“तरी पण सांग ना तुला कोणाला पाहून कुछ कुछ होता है क्या ;) ”

“फिलहाल बहोत कुछ हो रहा है. तू सापड तावडीत चांगले धपाटे देतो. आत्ता पुरे कर”

“लाजला........ लाजला.... दाल मे कुछ काला है ”

“पूर्ण डाळच काळी आहे. काय ग ढम्मे तुला का एवढा पुळका आलाय ?”

“ओये पुळका वगेरे काही नाही ... नको सांगू राहू दे ”

“ये हुई नं बात !”

‘काय आत्ता पाहायचं. मदत लागेल ना तेव्हा येशील माझ्याकडे. लोटांगण घालत’

“स्वप्न बघा ....”

'तू सांगणार नाहीस तर.... ठीक आहे .... '

"हम्म्म्म "

मला ठसका, बोलण्यापेक्षा खोकला लागला. वृंदा अचानक असे का बोलतीय नक्कीच गडबड दिसत आहे.

नुकतीच १०वी, १२ वी होऊन कालेजात जाणारी पोरं असे एकदम ak47 ने गोळ्यांचा वर्षाव अन् बॉम्ब यांचा धडाधड मारा अंगावर करत होती! आणि मी आपला साधा. भोळा. मला कुठे GF? आणि हल्ली मैत्री वेगळी. फ्रेंड्स वेगळे. अन बेस्ट फ्रेंड्स फोरेवर वेगळे. अर्थात बॉयफ्रेंड गर्लफ्रेंड चा तर विषयच सोडा. डेफ़िनिशनचा सुळसुळाट फार झालाय.

दिवस उजाडताच sms पुराण पुन्हा सुरु.

मी सकाळ सकाळ कालेजात जाता जाता ऑनलाईन sms पॅक मारला अन माझ्या जीवात जीव आला. पहिले लेक्चर झाले अन आत्ता दोन वाजता लेक्चर होते. तोवर माश्या मारण्यापेक्षा लॅबमध्ये प्रोग्राम रन करत बसलो होतो. तेवढेच HOD खुश ... अख्खी ल्याब रिकामी. सरांना खात्री पटली. पोरं प्रोग्राम करत आहेत. तेही बाहेर गेले ... मग काय यु-टूब. फेसबुक. गाणे डाऊनलोड असले उद्योग सुरु !

तोच sms चा पुढचा अध्याय सुरु झाला

वृंदा : गुड मॉर्निंग...... ह्याव ए नाईस डे !

“आज लवकर उठलीस बाळ !”

“तुझे वाजले असतील रे बारा पण माझी पहाट जस्ट झालीये ”

“मुद्याला हात घाल पटकन. उगा फिरवू नकोस. वेळ नाहीये. काय काम आहे ते बोल ”

“तू उत्तर नाही दिलेस अजून ”

“काकूबाई. अंबाबाई. कालच्या अन आजच्या उत्तरात बदल नाहीये. खरंच मला gf नाही. हा विषय सोडून काय  बोलायचे ते बोल :)”

“ठीके. आणि ये मी काय काकूबाई नाहीये समजले :( !”

“हे बघ तुला जर बॉयफ्रेंड वगेरे आहेत हे माझ्या कानी पडू देच. मग पहा मी काय करतो ते !”

“शक्यच नाही ....”

“माझ्या पासून काही लपून राहत नाही. कानाकोपऱ्यातून प्रत्येक बातमी समजते”

“हो का !!!! ”

“हो”

“ह्म्म्म्म्म्म्म्म  :) बाय द वे आपली राधा माहितीय ”

“काय? कोण राधा ..........हां हां... आले लक्षात..  हो....... तिचे काय ?”

“नशीब माहित आहे :p ती तुझ्या मागे मागे किती करत होती रे”

“हो यार. मी खूप टाळत होते तिला :( ”

“खूप गोड आहे ना ... :)”

“श्या. तुझ्याइतकं कोण गोड मुळीच नाही”

“वर्षापूर्वी एक कार्यक्रम झालेला. तुझ्यावर सगळी कामाची जबाबदारी होती. सगळ्यांच्या नजरा तुझ्यावर खिळून होत्या :)”

“हो मग असणारच. भाऊ कोणाचा आहे मग ”

“राधा ने मला सांगितले होते. तिला तू खूप आवडतोस. तुला? ”

“काय !!!!!!!!!!!!!!!!!!! उगाच शेंडी लाऊ नकोस ”

“खरेच यार”

“मग मी काय करू?”

“किती अनरोमॅंटिक आहेस रे. आत्ता एवढे सांगूनही तुला काहीच कसे कळत नाहीये?”

“कळण्यासारखे काय आहे त्यात?”

“ तुला पण ती........... ”

“असे मनात पण आणू नकोस. आयला काय पण हं तुझे हे ! ”

“काही पण नाही. तुला ती नक्कींच आवडतेय .......”

“चूप.. आगावपणा करू नकोस हं !”

“हम्म्म्म .... दाद्या ... कळाले कळाले !”

“गो टू हेल .... मला अजिबात बोलू नकोस वृंदा ..”

माझी बोलती बंद.  अचानक काही सुचेनाच  मग ते सिनेम्याटिक दिवस डोळयापुढे रेंगाळू लागले.

# प्रेमाची चाहूल

एक प्रकार असतोच. या कॉलेजच्या वयात साहजिक एकमेकांचे चालणे. बोलणे, वागणे, केसाची ठेवण चेहरापट्टी आणि त्याच्यात असणाऱ्या कलागुणामुळे एखादी व्यक्ती आवडू लागते. सहसा शाळेत उमलणारे प्रेम, त्यानंतर कालेजात आणि त्यानंतर ऑफ़िसमध्ये अश्या पायऱ्या असतात ... शाळेच्या काळात असतंच काय? भाबडं प्रेम आपुलकी असती त्यात म्हणा. हेच सारं काय अगदी शाळेत ७वी ८वी पासून असे प्रकार सुरु होतात म्हणा. किंवा सुरुवात असते अगदी. प्रेम असते तरी काय याचा नेमका अर्थ पण कळत नसतो. ‘तो’ अथवा ‘ती’ शाळेत आली तरच मन रमतं. मग वर्गात गपचूप चोरून पाहणं. आणि सतत “मी किती काळजी घेतोय.” ते दाखवत राहणं. मदतीची संधी शोधत रहाणं. डब्यात काही विशेष पदार्थ दिला आईने कि तिची (किंवा त्याची) वाटणी ठेवणं. चॉकलेटचा तुकडा देणं. निमित्त मिळालं रे मिळालं कि बोलायला जाणं.

भांडणं. वाद घालणं. आणि एखादे वेळी मग दिवस भरात कोणी दोघांपैकी एकाच दर्शन झालं नाही तर मग उगाच कश्यात मन न लागणं. मित्राचे ते बोलणं.

‘आज वहिनी रजेवर आहेत वाटतं. तरीच माकड आज उड्या मारत नाहीये. :) ’

’अगं आज नोट्स वगैरे नीट घे. जिजूंना उद्या झेरोक्स द्यायची नं?’

वगैरे वगैरे

शाळेत थोडकेच जण प्रेमात पडतात. जे ओव्हर स्मार्ट असतात ना ते. खूप थोडे जण शाळेत आपले प्रेम व्यक्त करतात. त्यावेळची गंमत म्हणजे ‘ती’ कुठे राहते? क्लासला कुठे जाते? किती वाजता? कोणत्या रस्त्याने? बरोबर कोण असतं. भाऊ बाप वगैरे कसे आहेत( म्हणजे त्यांची बॉडी-बिडी) वगैरे सगळया बाबी नोटीस करून त्याच वेळी घरातली  बाईक गुपचूप काढायची अन् तिच्या समोरून जायचे अर्थात ‘लाईन’ च्या.

तरीच! तरीच मला शंका होतीच. थोडासा अंदाज येतोच. पण राधाचे ते काय वय हो? आमची ओळख झाली तेव्हा ती तर शाळेतच. मी जरी मोठा असलो तरी अकरावी बारावीत. आणि माझ्यात तिने काय पाहिले कुणास ठाऊक. म्हणे तर तिला मी आवडू लागलो. म्हणून मला शंका होती. धोक्याची घंटा वाजत होती. कि काही तरी गडबड आहे. राधा माझ्यावर फिदा तर नाही ना. किंवा मला इम्प्रेस तर करत नाहीना. अश्या वेगळ्या प्रश्नांनी मला घेरले होते. म्हणजे असतं कसं कि मनातल्या मनात वाटत रहातं की तिला आपण आवडतो. पण नंतर वाटतं की आपला हा वहम आहे. उगाच मनाचे खेळ. मग हो-नाही

मध्ये सगळा वेळ संपून जातो. तरी मनातून राधा काही माझी पाठ सोडायचे नाव घेत नव्हती. मी तिला त्यावेळी खूप टाळत होतो. आणि वर्षे उलटली.

एसएमएस पुराण सुरूच होते

" त्यात काय ग. सर्वांनाच मी हवासा वाटतो यात माझा काय दोष? "

"पण तिने प्रपोज केला नाही कारण तिला डाउट होता तूला दुसरी कोण आवडत असेल! तिच्या कानावर आले होते बहुदा"

"ह्या. आमचे नशीब कुठे तितके आणि. असे विचार आजवर कधीच केले नव्हते. तिचे कान तूच फुंकले असतील"

"हो नं. जणू मीच फुंकणी घेऊन बसली होते ना. चुल फुंकायच्या ऐवजी तिचे कान फुंकत बसले."

" हा हा हा हा "

" आजही तुला ती आवडते ना "

"हे काय भलतेच लावले आहे ? जोकिंगला पण लिमिट असते. आणि काय गो. तू का इतका इंटरेस्ट दाखवत आहेस ? "

"अरे विनू.... मग स्पष्ट नाही का म्हणत नाहीस?"

"नक्कीच गडबड आहे. तू तिची मदत तर करत नाहीस ना? सेटिंग तर नाहीये ना ? "

"नाही रे. आमचं भांडण झालेय ... बोलत सुद्धा नाही आम्ही "

“तुम्हालाच काय ते माहिती बुवा. असो बाकी अजून काय ”

“निवांत चालुये.. बाकी मजेत. खूप जण फ्लर्ट करतात माझ्यासोबत... तोच ताप आहे ”

“ह्म्म्म! तू आत्ता अभ्यासावर लक्ष दे. या असल्या बारा भानगडीत अजिबात पडू नकोस”

“ठीके ... नंतर बोलू ”

मी जरा दाब दिला. त्यानंतर बरेच दिवस बोलणे नाही काही नाही

मी वृंदाशी SMS च्याट करणे सोडले. हि सगळी चर्चा SMS वरच फक्त. फोन वर मिरवणुकीत झालेले बोलणे तेवढेच काय ते. काही दिवस उलटल्यावर फेसबुकवर अपलोड केलेल्या माझ्या प्रोफ़ाईलची ती फ्रेंड झाली. पण ती कधीच ऑनलाईन नसायची. fb पण काय? नसता उद्योग. अधून मधून सगळीकडे फेरफटका मारायचा अन एखादी चांगली पोस्ट किंवा चारोळी दिसली कि लगेच ती ढापायची. आपल्या स्टेटसवर टाकायची. माझे असेच उद्योग.

आत्ता फेसबुकचा विषयच निघालाय म्हणून सांगतो. फेसबुक काय आहे आणि ते किती उपयोगी आहे आहे ते वापरणाऱ्या व्यक्तीलाच कळते. ज्यांनी कधी उघडून पहिलेच नाही किमान त्यांनी तरी याबद्दल तोंडातून ‘ब्र‘ देखील काढू नये. फेसबुक हे काय आहे ते बोलून किंवा सांगून समजावता येत नाही मुळात. कॉम्पुटरला हातच लावायला घाबरणारी काही मंडळी असतात. त्यांना कितीही समजावलं तरी काही उपयोगच नाही ना! अर्थात आजोबांचेच उदाहरण घ्या. पेपर मध्ये अधून मधून फेसबुक वर झालेले राडे म्हणा किंवा सायबर क्राईमच्या

वगैरेच्या बातम्या ज्या छापून येतात त्या चार चारदा चष्मा वर खाली करू करू अगदी चवीने वाचणार हे. डोम्बले डोक्यावरून पाणी जरी गेले तरी बातमी मोठ्याने वाचणार. कारण माझ्या तोंडून उठ कि सुट फेसबुक चे गुणगान होत असते ना. वार्ताहर लोग कधी फेसबुकबद्दल चांगल्या बातम्या छापणार नाही. त्यामुळे या मंडळीना फेसबुक हा टूक्कारपणा वाटतो. आणि हल्ली कोणताही पाहुणा घरी आला कि याच गप्पा असतात. मी मग सांगतो “आम्ही भेटतो रोज फेसबुकवर आणि खूप धमाल करतो”. अन लगेच आजोबांच्या चेहरा पाहण्यासारखा होतो.

मी त्यांना शिकवतो म्हणले तर हो म्हणतात. म्हणजे आतून हवंहवं पण आहेच. एक दोन वेळेस समजावले पण होते. आत्ता त्यांना किती उमजले माहित नाही. पण त्यांच्या जेष्ठ नागरिक क्लब मध्ये मात्र नातवाचे कौतूकच कौतूक चालू असते .

तर त्या दिवशी फेसबुक लाईक कमेंट पुराण चालू होते. आणि खूप रातकिडे जागे होते. मी गप्पा मारत बसलो होतो. साईडला चॉकलेट आईसक्रीम घेऊन बसलो होतो.

तोच टेबलावर ठेवलेला मोबाईल ने गुर गुर केले . सायलेंट होता .

मी लगेच झट कि पट घेतला अन पाहिला.

काय म्हणता? ओळखलंत? हो बरोबर. वृंदाचाच मेसेज आला

“राधाचं आणि माझं भांडण झालेय. त्यामुळे आम्ही बोलत नाही आहोत मी तुला राधा चा नंबर पाठवते. तिला तू माझा हा नंबर तिला पाठव”

“हो. पण मी का पाठवू? तुझ्याकडे आहे तर तूच बोल ना”

“हो रे. पण आम्ही बोलत नाही आहोत... तिने केला फोन तरच मी बोलणार. त्यामुळे तिचा हा नंबर घे आणि तिला मेसेज कर”

“ठीक आहे बाबा...... जशी तुझी इच्छा”

वृंदाने सांगीतल्याप्रमाणे मी केलं. हिचा नंबर तिला पाठवला.

बऱ्याच दिवसांनी कॉलेजकडून कोल्हापुर आणि नंतर तिथून पुढे बंगरूळला टेक्नोइव्हेंट आहे आणि जाणाऱ्या टीम ला सांभाळायचे काम माझ्यावर सोपवले.

माझ्या अंगी असलेला ऑलराउंड स्मार्टनेस, चतुराईमुळे मी आपला HOD सरांचा बकरा होतो. कुठून माझ्या अंगी इतके गुण ठासून भरले होते देव जाणे. काम काहीही असो मी आहेच आपला. आणि सर लोग यायचे टाळायचे. पण एक मधू म्याम नवीनच जॉईन झाल्या होत्या. त्या येणार. हे कळताच सगळे यायला टपून बसले आणि गोंधळ उडाला. हि आयती संधीच असते. पोरं मिळून गाडी ठरवणार, सगळि व्यवस्था बघणार, आणि यात सर लोक उखळ पांढरं करून घेत. आम्हाला काही साधं सुधं जेवण देत. आपण मात्र मस्त बिर्यानी, पुलाववर ताव मारत. टेक्नोइव्हेंट राहिला बाजूला. जणू पिकनिक आल्यासारखे सर् लोग अगदी पोरापोरींत मिसळून जात!

मी गपचूप सटकलो आणि मन करत नव्हते जायचे त्यामुळे घरी जाऊन झोपलो.

पहाटे डोळे उघडतो तर समोर मधू म्याम दिसू लागल्या. मधूने मस्त स्माईल दिली. मीही ॲक्शनला रिएक्शन म्हणून हसून एक डोळा मिचकावला अन परत झोपलो.  पुन्हा डोळे उघडले तर समोर म्याम नाही HOD होते !

परत सगळे फ्रेंड माझ्याकडे पाहत होते. डोळे चोळले अन लक्षात आले कि घरी नसून मी कोल्हापूरला जातोय. मध्यरात्री गाडीत जाऊन बसलेलो. स्वप्न नसून खरोखरच आपण कोल्हापूर ला जातोय हे लक्षात आले .

गाडीत कोण कोण आहे याचा आढावा घायला उठलो. अन परत पुढच्या सीटवर बसलेली मधू. तिने तशीच स्माईल मला पाहून दिली. नशीब मी परत तशीच एका डोळ्याची रिएक्शन दिली नाही. मी गालातल्या गालात हसलो आणि मान नकारार्थी हलवली. मधू म्हणाली

‘काय....झालं?  झाली का झोप?’

मी परत होकारार्थी मान हलवली अन जागेवर बसलो.

इव्हेंट उत्तम पार पडला. पडणारच होता .........

समारोप कार्यक्रमाला वेळ होता म्हणून देवीचे दर्शन घ्यायला एकटाच निघालो. रिक्षात बसणार तोच मधूने हाक मारली

‘वैद्यबुवा कुठे कुठे निघालेत?’

‘देवीला चाललोय. यायचं का?’

'हो हो .. आलेच '

'चला' (च्यायला टपकली मधेच)

मंदिरात पोहोचलो अन् योगायोग असा झाला कि प्रदक्षिणा मारताना अचानक वृंदा समोर आली. मी तिला बाजूला हात धरून आणले अन बोलू लागलो. ती आहे अशीच होती. मात्र मला मिश्या फुटल्याने तिने ओळखले नाही.

'किती हात धुऊन माझ्या मागे लागलीस ग ढमे'

'काय...?'

'असा चेहरा केलाय जणू किती वर्षांनी बोलत आहेस '

'हो ... बरोबर आहे '

'मग ते sms मला कोण तुझ भूत पाठवत होते का ?'

'कसले sms? हा बघ. कालच पप्पांनी मला मोबाईल घेवून दिलाय. अन् तू हे काय विचित्र बडबडतोय? पहा तुझा नंबर तरी आहे का माझ्याकडे. कसे एसएमएस कसे पाठवणार? नक्कीच माझ्या नावाने तुला कोणीतरी बोलून उल्लू बनवले असेल'

'खरेच कि काय? हा नंबर कोणाचा आहे?'

'ओए. हा माझा नंबर नाहीये. थांब तुला माझा नंबर देते. बरं चल घरी आत्ता.'

'आत्ता पुढे जायचे आहे. परतीच्या प्रवासात मी घरी एक दिवस थांबेन. मग तर झालं'

'ठीके. बरे झाले गाठ पडली. नंतर बोलू सविस्तर आपण.'

उफ़...... बोलणारी व्यक्ती वृंदा नव्हती हे कळल्यावर माझ्या तर पायाखालची जमीनच सरकली होती. मी वरवर नॉर्मल वागत होतो. इकडे मधू प्रदक्षिणा घालतच होती

एक....दोन..तीन.......... ... घालतच जात होती अन मागे वळून वळून रागाने पाहत होती. काय गंमत आहे. मी लगेच वृंदाला मिठी मारून निरोप घेतच होतो. कि मधू ने टपली मारली.

"वैद्य बुवा बस्स झाले चला आत्ता..."

मग मीच मधूची अन् वृंदाची ओळख करून दिली. इकडे फ्रेंडचे फोन येऊ लागले. मधू अन विनू कुठे गायब झालेत? उगाच लोकांना नसत्या स्कॅंडल रुमरचा चान्स नको. म्हणून वृंदाचा निरोप घेऊन लवकर कालेजात निघालो. वाटेत प्रसाद घेतला. म्याम ने मला एक चॉकलेट घेतलं. ते खात खात रिक्षा पकडली आणि लवकर संपवलं. उगाच पंटर लोकांना स्कॅंडलसाठी मसाला नको.

कॉलेजवर परत जाताना रिक्षात मॅम ने अनेक प्रश्न विचारून डोकं आउट केलं. काय माहित देव जाणे. पण मधूला मी जास्त मुलींना बोललेलं आवडायचे नाही. आणि सारखे हिचे चार डोळे माझ्यावर सीसीटीव्ही प्रमाणे नजर ठेवून असत !

कार्यक्रम अप्रतिम पार पडला. अपेक्षेप्रमाणे पहिला नंबर हुकला आणि दुसऱ्या नंबरवर समाधान मानावे लागले. सांस्कृतिक कार्यक्रम सुरु झाले. बाहेरगाववरून आलेल्यांसाठी जेवणाची सोय होती.

कडक पुऱ्या. मसालेदार 'मसाला भात'. बटाट्याची रस्सा भाजी. त्यात एका अख्या बटाट्यानेच वाटी ओवर फ्लो. चटणी कोशिंबीर. भजे. पापड. अन् आईस्क्रीम ! इतके जण तुटून पडले होते कि बस्स! मी गेलोच नाही. बाकी टीम एकाच्या अंगावर एक पडून एक एक प्लेट आणत होते. हातात ताट धरून खुर्च्या पकडायला होणारी धावा धाव. आणि हॉल मध्ये घुमणारे चित्र विचित्र आवाजाने डोके गरगरू लागले. हे काही बरोबर वाटेना. मी आपला बाहेर जाणाऱ्या येणाऱ्या गाड्या पाहत उभा होतो. मधूची माझ्यावर नजर पडली आणि आली.

'काय रे. जेवून घे. इथे तुला कोणी आग्रह करणार नाहीये.' मग माझा थोबडा बघून तीच म्हणाली, 'एक काम करू यांचे खादडून होईपर्यंत आपण मिसळ खावून येऊ चल.'

'हो माम. पण... माझा खिसा रिकामा आहे. भांडे घासायची वेळ येऊ देवू नकात'

'चल रे .....! माझ्या तर्फे... चल'

गोंगाटातून कल्टी मारली आणि मिसळ पाव आस्वाद घेतला. लाल लाल तरीची मिसळ. गरमागरम. वर्ल्ड फ़ेमस. आणि खास गरमागरम ताजे ताजे मऊ मऊ पाव. सोबत एक्स्ट्रा रस्सा. सपाटून खाल्ली. मधूने पण बोटं चाटत चाटत खाल्ली. तिखटाने तिचाही चेहरा लालेलाल झाला. उशीर होयच्या आत मी आणि मधू परतलो आणि गाडीपाशी सर्वांची यायची वाट पाहू लागलो.

डुलत डुलत ढेकरा देत पोरं मागोमाग सर लोग आले. रात्रीचा प्रवास होता आणि जेवलेल्या मंडळी बरोबर बसणे म्हणजे नाकाला सारखा रुमाल लावावा लागेल हे माझ्या ध्यानात आले आणि मी मधूला हे कानात सांगितले.

आपण पुढेच एकाच सीटवर बसू म्हणालो. तिला जणू हेच हवं होते.  आत्ता पुढचा प्रवास सुरु झाला.

गाडीत निवांत बसल्यावर माझी चक्रे गरगरा फ़िरू लागली. माझ्या मनात किलबिल सुरु झाली. वेगळयाच शंका उपस्थिती होऊ लागल्या.

मग तो फोन.............

ती एसएमएस वरील बातचीत.............

कि वृंदा काहीतरी लपवतेय .........

कोण करत असेल हे ..........

जर ती वृंदा नव्हती तर कोण होती.........

विचारांचे भलतेच वारे वाहू लागले. हे काय चाललाय त्याचा आढावा घ्यायला सुरुवात केली. हळू हळू एक एक रंजक बाबी समोर येऊ लागल्या. आणि माझ्यातला जेम्स बॉंड जागा झाला.

# डिटेक्टीव्ह

यापूर्वी कधीच असा लोच्या झाला नव्हता ... वेगळा अनुभवच! मी या बाबतीत फारसा पारंगत नव्हतो. किंबहुना मित्रांचे (त्याचबरोबर प्रत्येकाचे) ते सारखे त्या मोबाईल ला चिटकून राहणे मला खपायचे नाही. सारखा मोबाईल हातात. जरा कुठे दिसेना झाला कि जीव कासावीस व्हायचा... तो दुसऱ्याच्या हातात पडू देयाचा नाही. का तर त्यातले गुफ्तगू कळू नये म्हणून. मैत्रिणीचा फोन आला कि चार हात लांब जाऊन एखादा आडोसा पकडून बोलणे. कोणाला ऐकू तर येणार नाही ना असे ठिकाण ठरलेले असतात. तिथे फोनवर तासंतास बोलण्यात पार बुडून जायचे. इतके कि कसलेच भान नसते. जेवणावर लक्ष नसायचे. मला तर जाम राग यायचा.

अशीच एक मित्राची एक किश्शी. दिवसभर कॉलेजात बोलून देखील रात्री ९-१० च्या पुढे घरातली मंडळी झोपली कि यांचा दिवस सुरु होयचा. मग फोनवर मुली इतक्या हळू बोलतात कि बस्स ... बापरे !

मुलांचे पहाडी आवाज. आमच्या या मित्राला हळू मंजुळ बोलणं जमायचे नाही. त्यामुळे मग वर टेरेसवर जावून गप्पा माराव्या लागत. यात गंमत अशी कि पायऱ्या चढता उतरता आवाज होवू नये म्हणून मांजरीप्रमाणे दबकत दबकत ते चालणे..... त्यात जीना रीकामा असतोच कुठे? त्यात सतरा अडथळे असतात. चपला. बुट. कचरा भरायचे सूप ब्ला.... ब्ला... ब्ला... ते चुकवत चुकवत जावं लागतं. त्यात तरी खरी कसरत होती. नाहीतर चुकून कचरा भरायच्या सुपावर पाय पडला कि सत्यानाश !!!

लगेच पळत पळत अंथरुणात घुसायचे. थोड्यावेळाने परत जीना चढायला सुरुवात करायची. शेवटी कसेबसे गच्चीच्या दारापर्यंत पोहोचल्यावर खरी अग्नी परीक्षा असते. त्यांच्या गच्चीचे ते कर्रकर्र करणारे फ़ुगलेले दार. सहजा सहजी हलके उघडणारे ते दर कसले? कर्कश्श आवाज करणारे. कारण पावसात भिजून भिजून टर्र फुगले असते ना... असा खडतर प्रवास करून गच्चीत पाय ठेवल्यावर एव्हरेस्टवर झेंडा रोवल्यागत फील होतं. आत्ता भलतीच रेंज आलेली असते. गप्पांचा धबधबा रात्री १- २ वाजेपर्यंत कोसळायचा. रोजच हे यशस्वी होते अश्यातला भाग नाही... कधी आई मागे उभी ठाकते. मग 'त त प प' होते. आईला समजत असते सगळे. काही लपून राहत नाही! पण ती दाखवत नाही. वयात आलेल्या पोरांच्या अया ज्याम हुशार असतात. पण पोरापोरींना वाटते आपली आई बावळट. ती एक धपाटा घालून झोप आत्ता म्हणते. लेकरू घाबरून अंथरुणात पडते. झोपायचे नाटक नुसते.

मुलींची वेगळी बाब असते. त्या फोनवर अश्या बोलणार कि जणू मैत्रिणींनाच बोलत आहे. आणि मुलांप्रमाणे धांदरट हुलहुल्या नसतात. कानोसा घेवून बोलणार.

मला असे प्रकार पाहून गंम्मत वाटायची. किंबहुना हेही अनुभवावे वाटायचे.

त्यात पण एक सॉलिड बाब अशी कि एक तर मुले काही कमवत नसतात. पण पॉकेटमनी बक्कळ हो! मुली पण लई डांबिस. मित्रांचे खिसे रिकामे करण्यात पटाईत असतात. मुळात मुलेच फार लाड करतात... डेरींमिल्क सिल्क ते डायमंड रिंग जे झेपेल ते सगळे काही. हॉटेलात, ते पण AC रूममध्ये नेणार. लाडिकपणे हे मागव ते मागव करणार. आणि शेवटी आईस्क्रीम किंवा फ़ालुदा वगैरे खाणार. आणि नंतर माझं वजन वाढेल, पुरे आता म्हणत त्यालाच शिव्या घालणार.

फोनवर बोलायच्या त्या ठरलेल्या वेळा. चुकून माकून घरच्या मंडळीनी फोन उचलला तर काय करायचे. किंवा अर्जंट काम असेल आणि जवळ कोणी असेल तर फोन कसा घ्यावा, आणि बोलावे कसे. ना ना प्रकारच्या युक्त्यांचा वापर मित्रलोग कसे करायचे चांगलाच जाणून होतो.

त्यामुळे आता मी वृंदा नाव धारण करून हातावर तुरी देणारी किंवा देणारा इसम कोण असेल याची शोध मोहिम सुरु केली. पहिल्यांदा एक चार दोन दिवसांनी त्या नंबर वर फोन करून रिंग वाजायची पण उचलणे नसायचे. मग कदाचित माझा नंबर पाहून उचलत नसेल म्हणून दुसऱ्या नंबरवरून प्रयत्न चालू ठेवला. अचानक एके दिवशी फोन उचलला. समोरचा आवाज मुलीचाच होता. पण मी ओळख लपवून बोलू लागलो. तेव्हा समोरून म्हणावे अशी प्रतिक्रिया

आली नाही. तोडके मोडके हिंदी शब्द कानावर पडले. खरेतर मीच उल्लू बनलो होतो. काही दिवसांनी तो नंबरच बंद लागला. काहीच सुचेना

इथेच पूर्णविराम नको होता. मी प्रत्येक मैत्रिणीकडे आणि तायालोकांवर संशयाने पाहत होतो.

कॉलेजात लेक्चर चालू होते. अचानक मी ओरडलो ‘यस्सस्स आईडिया........!’ सगळे माझ्याकडे पाहू लागले. गालातल्या गालात हसू लागले. माझा मात्र चेहरा खजिल झाला होता. सरांनी माझी टिंगल उडवली आणि पूर्वपदावर क्लास सुरु होता. पण माझ्या डोक्यात भलतेच

वृंदा ने राधा चा नंबर दिलेला आठवला. त्या नंबर वर  एस.एम.एस केला

“हाय. धिस इज विनीत. आपण कोण आहात? तुमचा नंबर माझ्याकडे सेव नाहीये आणि आपले एसएमएस मला आले आहेत”

लगेच उत्तर आले .

“ओह हाय विनीत. मी राधा. कसा आहेस तू? कुठे आहेस? काय करतोय सध्या आणि माझा नंबर तुझ्या कडे कसा काय ?”

मी राधाला असा  बोलत होतो कि जणू मला काहीच माहित नाही नाही कि वृंदाच्या फेक नावाने कोणीतरी बोलले. थेट राधा कडून जाणून घेयचे. टूबलाईट पेटली

“हो हो. अग किती प्रश्न विचारशील? सांगतो सगळे पण एक सांग मला वृंदाने  तुझा नंबर दिला होता आणि एक एसएमएस हि तुला केला होता तुला

मागे; तुमचे भांडण झाले होते म्हणे आणि तू तिला बोललीस का नाही? मला कसे कळणार तू रिप्लाय पण दिला नाहीस :/”

“हो मिळाला मिळाला. आमचे सहसा पटत नाहीये. पण आम्ही खूप दिवसांनी बोललो. माझा नंबर तिच्या कडे नव्हता म्हणून. तू दिलास बरे झाले”

हम्म्म. पूर्ण गोंधळात गोंधळ. वृंदाने चक्क हे सांगितले होते कि तिने हा कारभार केला नाहीय. वृंदाकडे तर फ़ोनच नव्हता. मग वृंदाने राधाशी गप्पा कश्या मारल्या समजेना. एक नक्की की राधा खोटं बोलत होती. काय बोलणे झाले हे जाणून घेतल्यावर कळाले कि वृंदाची अन माझी  झालेली चाटींग संपूर्ण राधा ला माहित आहे. आणि इथेच पहिला धागा गवसला. तिच्या बोलण्यातून कळले कि सगळया गप्पा राधाला माहित होत्या. याचा अर्थ मी काय घ्यायचा तो घेतला. तेव्हा वृंदाच्या नावाने हीच बोलत असावी असे वाटले !

“बरं. ठीक आहे. तूझी एक खबर कानावर आली आहे माझ्या. जे ऐकलं ते खरे आहे का ?”

“काय ऐकले आहेस :P ?”

“तू म्हणे मला प्रपोज करणार होतीस? काय पण हा हा हा !

“ तोंड बघ आरश्यात. तुला अन प्रोपोझ? ह्या...! त्यापेक्षा  जीव दिलेला बरा”

“दे मग जीव!”

“तू तर मला टाळत होतास म्हणे :P”

“तुला कोण म्हणले ?”

“वृंदाने सगळे सांगितले आहे !”

“हो का. बरं”

“हम्म्म्म !”

“हे हि सांगितले आहे कि तूला gf आहे ”

“नाही गं. उगाच काहीही बोलू नकोस”

आणि वृंदा हा विषय राहिला बाजूलाच आणि नवीनच चर्चा रंगू लागली. एसएमएस येतच होते.

आत्ता राधा दिसायला बरी होती. बेढब आहे अश्यातला भाग नव्हता. स्मार्ट होती. साधारण उंची. नाजूक नाक. गोबरे गाल. टपोरे पाणीदार डोळे ... हवेवर झुलणारे केस. सावळा वर्ण. सौंदर्य कधीच शब्दात मांडता येणार नाही असे. मी काय तिला कधी इम्प्रेस वगैरे करायचा प्रयत्न झंझट कधी केला नव्हता. कारण कॉलेजात २८ मुलीत ७ मुले होती. त्यामुळे मुलींमध्ये वावरणे बोलणे वगैरे अवघड काम माझ्या अंगवळणी पडले होते. तिची समजूत वेगळीच! मुलींशी स्वच्छ बोलणे सोप्पे असते असे मुळीच बोलत नाहीये. लक्ष्यात घ्या. कितीही केलं तरी मुलींना बोलायला धमक हवी

मी आता जाणू लागलो होतो राधाच्या मनातले विचार. आणि मग उगाच गंमत म्हणून खोटे बोलतो आहे म्हणून तिचे रिप्लाय येत होते. पण तिची नाराजी दिसून येत होती. हेही कळून चुकले होते कि वृंदाच्या नावाने राधानेच एसएमएस रामायण घडवले होते . फक्त राधाच्या तोंडून मला ते वदवून घेयचे होते.

खूप प्रयत्न केले तरी राधा काही तयार होईना ... शेवटी अचानक

# स्वप्नभंग

काही दिवसांनी अचानक शनिवारवाड्यात राधा कोणातरी एका झिपऱ्याच्या बरोबर चालताना दिसली. म्हणजे माझ्यासमोर योगायोगाने प्रगट दर्शन झाले. समोर येताच राधा चपापली; आणि नजरा नजर झाली. मी जरा चेहऱ्यावर रागीट भाव वधारले आणि संतापायचा नाटकी आव आणला. रंगभूमीवरचा पारंगत माणूस मी. तिने माझे भाव हेरले. आणि तिने काही सांगण्यापूर्वी तिथून मी असा काही तरातरा निघून गेलो कि आत्ता राधाचे काही खरे नाही. ती मागे हाक मारून बेजार.

त्याच रात्री राधाने फोन केला. तिचा आवाज अगदी मऊ. पोलादपण वितळेल असा. पण मी ढिम्म. “अरे तू जे पाहिलास ते काही नाहीये रे. उगाच गैरसमज  करू नकोस. आणि हेमंतला या बाबतीतले काही बोलू नकोस.”

ओह्ह. म्हणजे ती भिती आहे तर. हेमंत हा राधाचा भाऊ. नुकताच माझा फेसबुक फ्रेंड झाला होता. तसं आमचं खास बोलणं नव्हतं. पण तिला काय माहित? त्यामुळे राधाला धडकी भरली. तिला वाटलं...'हा सांगणार दिसतोय सगळे'.

मी कश्याला मध्ये पडणार होतो? उलट एक ग्रेट कल्पना सुचली. स्ट्ट्याक्. एकदम सिक्सर. हीच ती वेळ--- हाच तो क्षण होता. मौकेपे चौका.

मी माझ्या आवाजात राग तसाच ठेवून विचारलं...'राधा. खरं अगदी खरं सांग. वृंदा च्या नावाने तूच बोलत होतीस कि नाही? sms करत होतीस ना?'

'काय असं कसं? काहीपण बोलू नकोस'

'हे बघ! खोटं बोलू नकोस. हेमंतला आत्ता फोन करतो. तू त्या झिपऱ्याच्या बरोबर फिरत होतीस. सांगू का ?'

राधा पूर्ण पणे तावडीत सापडली होती .... मला माहित होतं ती आणि झिपऱ्या नुसते मित्र आहेत तरी गम्मत करत होतो. मात्र आवाज एकदम सिरियस. इंडियाज बेस्ट ड्रामेबाज.

'हो. विनू. मीच तुला वृंदाच्या नावाने बोलत होते'

'तू जरी थेट बोलली असतीस तर मी काही खाणार होतो का तुला ?'

'कसं कळत नाहीये रे तुला. मला तू आवडतोस '

मी जरा बुचकळ्यात पडलो..... पूर्ण ब्ल्यांक झालो होतो! माझा नाटकी अवतार पुरता विरघळला. पाण्यात साखर विरघळते तसा. आता माझी विकेट पडलेली.

या पुढे जास्त काही न बोलता, डायरेक्ट समोरासमोर भेट घेणं गरजेचे वाटले.

दिवस ठरला ..... संध्याकाळ. गार्डन. आईस्क्रीमवाल्याच्या कट्ट्याच्या मागची बाजू. गर्दी. त्यामुळे एकदम सेफ़. कधी कधी गर्दीतच एकांत चांगला मिळतो.

राधा तर वेळेच्या आधीच माझी वाट पाहत बसली होती

... मी बाईक लांबच उभी करून चालत येत होतो .. संपूर्ण जग थांबले होते आणि सगळे स्लो मोशन मध्ये दिसू लागले होते. आईस्क्रीमवाल्याकडे लोक हावरटासारखे आईसक्रीम चोखत होते. जिभा बाहेर काढून काढून. निवांत जिंदगी.

जगण्यासाठी आधीच आखून ठेवलेल्या योजना सोडून दिल्या. आणि माझी वाट पाहत थांबलेल्या खऱ्या खुऱ्या जगण्याची भेट होवू शकेल या भ्रमात. कुणीतरी हवं असतं प्रत्येकाला जीवनात साथ देणारं. मायेनं समजावणारं. हक्काने रागावणारं. आणि मुळात एकदम एका चित्रपटाप्रमाणे घडामोडी घडत गेल्या. त्यात हे पाखरू एकदम  गुरफटलं गेलं. उजाडणारा प्रत्येक दिवस एक नव्या उमेदीनं, नव्या जोशानं स्फूर्तीनं या जगण्याचा आनंद घेत होतो. कारण राधा मला प्रपोज करणार होती. आणि मी प्रथमच आयुष्याच्या पानांवर खऱ्या प्रेमाचं पर्व अनुभवत होतो .

राधा आली. नाजुक, गोरी, देखणी. राधा या नांवाला साजेसा ड्रेस. बांगड्या. साधाच पण सुंदर साज. फ़िकट ब्ल्यु बांगड्या. आणि त्याच रंगाची टिकली. समोरा समोर आलो .. स्लो मोशन चालू होतेच .... वाऱ्याची झुळूक

झाडाची सुकलेली पाने अलगद खाली येत होती .. होती.... आईस्क्रीमवाला तर नाहीसाच झाला. लोक अदृश्य झाले. फ़क्त मी राधा आणि आजूबाजूचा निसर्ग.

एकदम स्लो मोशन संपले आणि जोरात वारे वाहू लागले अन् राधा ची ओढणी माझ्या चेहऱ्यावर आली ...

राधा धाडस करून म्हणाली “मला असं वाटतं कि जसं तू मला आजवर मदत केलीस तशीच पुढे हि तू साथ द्यावीस. मी रडू लागले कि मला मिठीत घ्यावंस. मला तू आवडतोस. देशील साथ मला? सुख-दुखाचे काही क्षण तुझ्या सोबतच वाटायचे आहेत रे. माझ्या कडून काही चुका झाल्या असतील तर माफ कर.

देशील साथ ..... ?

मी पूर्ण म्याड झालेला. शब्द पण ओठ ओलांडून बाहेर येण्यासाठी धडपडत होते. एकदम शांतता पसरली होती ..... मोबाईल हातात घट्ट पकडून मी जागेवरच गोल गिरक्या घेवू लागलो. उफळत्या लाटा अन त्यावर स्वार असलेल्या भूतकाळातील आठवणींचे प्रतिबिंब झाकल्या डोळयांसमोर रेंगाळू लागले. बस्स रंगांची उधळण होणार होती आणि परत...

...परत फोन वाजू लागला. मी मात्र तो तसाच हातात घेवून गालातल्या गालात हसत होतो ........ राधा ला मिठीत घेऊन तिला रिप्लाय देतो न देतो तोच

तितक्यात आई ओरडली

“विन्या..... कार्ट्या आधी तो अलार्म बंद कर उठ. आणि तुम्ही लोळा अजून. स्वप्ने पाहत. ................. रात्री कोणत्या भवानीशी बोलत बसला होतास? अभ्यास करायचं सोडून. लाज वाटते हा असला मुलगा आमचा. थांबा आता.....”

अशा प्रकारे... FM रेडियो सुरू झाला...



galatalyagalat@gmail.com

# विनोबांची विनंती

मित्रहो .

जास्त नाही फक्त चार गोष्टी करतोय ...

सर्वप्रथम माझं पुस्तक पूर्ण वाचल्याबद्दल आपले आभार. या पेज पर्यंत आलात म्हणून तसं गृहित धरतो आहे. आणि ते तुम्हाला कसं वाटलं हे जाणून घ्यायची खुप खुप उत्सुकता लागून राहिली आहे.

या वयात माझं पुस्तक आपल्यापर्यंत पोहोचवल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान व नामकाकाचे आभार. माझी कथा प्रकाशित होतीय केवळ या ग्रुपने दाखवलेल्या आपुलकी खातर. काळानुरूप बदलत चाललेले लिखाणाचे स्वरूप दाखवत नवोदितांना प्रेरणा देण्याचे काम त्यांनी सुरू केले आहे. त्यात त्यांना भव्य यश लाभेल याची खात्री आहे. आपण वाचक जर आमच्या पाठीशी खंबीर उभे रहाल तर यश हे येणारच ना! आमच्या सारख्या नवोदित लेखकांना हा एक नवाच किरण भेटला आशेचा.

स्वप्नांच्या दुनियेचा हा पहिला भाग. खरंच आपल्याला स्वप्ने पडतात आणि एक वेगळीच गंमत असते . अश्यातला भाग नाही कि पडणारी सर्वच स्वप्ने हि गमतीदार असतील. कदाचित आजवर ‘भूत’ पाहून आपण

दचकून किंचाळत उठलाही असणार. वयानुसार स्वप्ने बदलत जातात लहानपणी  चॉकलेट च्या बंगल्या स्वप्नं पाहायची सुरुवात जीवनात होते. तिथून वेगळे वळण लाभते. सर्वांची आपापली स्वप्ननगरी असते. त्यात हवं तसं वावरू शकतो. पण तेच रियल लाइफमध्ये उतरवताना कितपत नाकी नऊ येतात; यासाठीच स्वप्न हि कल्पना असेल. तर मुद्दा असा कि विनूचे स्वप्न कितपत सत्यात उतरते आणि काय धमाल उडते. पुढे वाचायचंय ना?  मग त्यासाठी तुमच्या प्रतिक्रिया हव्यात ..... पुढला भाग हा फ़क्त मागणीनुसारच पाठवणार आहोत.

हा अट्टाहास का ?

तर एक मानसिक समाधान. चलबिचल असते कि आपण लिहितोय ते कितपत आपल्या गोष्टी वाचकांच्या मनात उतरल्या आहेत? खरंच पुढे हि माझं लिखाण चालू ठेवू कि नको? माझा छोटा हट्ट आहे प्लीझ प्लीझ. प्लीज मला कळवा.

मेल galatalyagalat@gmail.com

मोबाईल 8237756096 वर संपर्क

किंवा अगदी सोप्पं म्हणजे फेसबुक वर तुम्ही थेट गप्पा मारू शकता www.facebook.com/vinit.vaidya2

आपला मित्र

विनीत वैद्य

# ई साहित्य प्रतिष्ठानची विनंती

मराठी म्हणजे अमृताशी पैजा जिंकेल अशी गोड भाषा. मराठी म्हणजे औरंगजेबाच्या बापालाही सर न करता आलेला किल्ला. मराठी म्हणजे दलितांचा हुंकार. मराठी म्हणजे स्त्रीयांच्या शिक्षणाचा श्रीगणेशा. मराठी म्हणजे टिळक आणि आगरकर. मराठी म्हणजे फुले आणि सावरकर. मराठी म्हणजे तुकोबा आणि ज्ञानेश्वर. मराठी म्हणजे डांगे आणि आंबेडकर. मराठी म्हणजे ठाकरे आणि तेंडुलकर. २३०० वर्षं वापरली जाणारी भाषा मराठी. बारा कोटी जनांची भाषा मराठी. समृद्ध साहित्याची भाषा मराठी.

आणि काय ही आज मराठीची दूरवस्था! आज खुद्द महाराष्ट्रात दोन मराठी माणसेसुद्धा एकमेकांशी मराठीत बोलत नाहीत. महाराष्ट्रात दुकानांवर मराठी बोर्ड असावेत म्हणून “खळळ खट्टाक” करावे लागते. मराठी कवी लेखकांची मुलं इंग्रजी माध्यमात शिकतात. मराठी शाळा ओस आणि बंद पडत आहेत.

अशा वेळी मराठीचा डंका महाराष्ट्रात नव्हे, भारतात नव्हे तर जगभरात गजबजेल अशी स्वप्नं आम्ही पहातो. आमच्यासारखे अनेक लोक पहातात. २३०० वर्षांचा इतिहास असलेल्या या अमृतवाणी मराठी साहित्याचं सुवर्णयुग येईल अशी खात्री आम्ही बाळगतो. कारण मराठीत समृद्ध साहित्य आहे. कारण मराठी माणसांकडे बुद्धीमत्ता आहे. कारण मराठी माणसांकडे प्रतिभा आहे. कारण मराठी नवीन साहित्यिक आणि नवीन वाचकवर्ग उभा होताना आम्ही पहातो

आहोत. बारा कोटी मराठी माणसांच्या या भाषेला अमरत्त्व आहेच आहे याची आम्हाला शंभर टक्के खात्री आहे. म्हणून आम्ही  बारा लाख मराठी लेखक वाचकांचं नेटवर्क उभं करण्यासाठी आम्ही झटत असतो. दर आठवड्याला नवनवीन ई पुस्तकं दीड लाख लोकांना विनामूल्य पाठवत असतो.

हा यज्ञ दिवसेंदिवस मोठे रूप घेतो आहे. आणि त्यात हजारो हातांचं योगदान येत आहे. नवीन ताज्या दमाचे लेखक पुढे येत आहेत. अनुभवी ज्येष्ठ लेखक येत आहेत. हजारो लोक, रोज, कुणी आठ, कुणी दहा, कुणी शंभर, मेल आय डींचं योगदान देत आहेत. तुम्हीही तुमच्या ओळखीच्या शक्य तेवढ्या मराठी लोकांचे ई मेल आय डी आम्हाला पाठवा. त्यांना दर आठवड्याला विनामूल्य ई पुस्तकं पाठवली जातील. मराठी माणूस भले पैशात मागे असेल, पण वाचनात इतर लोकांपेक्षा नक्की पुढे आहे. लक्षात ठेवा!  आज ना उद्या ही गोगल गाय वाटणारी भाषा ढाण्या वाघाचं स्वरूप धारण करील. करीलच!

सर्वांची साथ हवी यार! कृपया आपल्या किमान आठ आप्त मित्रांच्या मेल आय डी esahity@gmail.com  या पत्त्यावर कळवा आणि या महायज्ञात सामिल करा. त्यांना आम्ही नवनवीन मराठी पुस्तकं विनामूल्य पाठवू.

आपले विश्वासू

टीम ई साहित्य प्रतिष्ठान